अहवाल क्रमांक : १४२

पंचायती राज समिती

(२०१३-२०१४)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

पाचवा अनुपालन अहवाल

(पंचायती राज समितीच्या दहाव्या विधानसभेतील सन १९९६-९७ च्या सातव्या अहवालातील चंद्रपूर व जळगांव जिल्हा परिषदेच्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईवरील समितीचा अनुपालन अहवाल)

(सदर अहवाल दिनांक १३ जून, २०१४ रोजी विधानसभेस/ विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१४

(दोन)

पंचायती राज समिती

(२०१३-२०१४)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

पाचवा अनुपालन अहवाल

(पंचायती राज समितीच्या दहाव्या विधानसभेतील सन १९९६-९७ च्या सातव्या अहवालातील चंद्रपूर व जळगांव जिल्हा परिषदेच्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईवरील समितीचा अनुपालन अहवाल)

(तीन)
पंचायती राज समिती
(२०१३-२०१४)

समिती प्रमुख

१. श्री.जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स.

सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५. श्री.विजयराव खडसे, वि.स.स.
६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७. श्री.दिलीप माने, वि.स.स.
८. श्री.भारत भालके, वि.स.स.
९. श्री.बाबासाहेब पाटील, वि.स.स.
१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
११. श्री.राजेंद्र शिंगणे, वि.स.स.
१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.
१३. श्री.संजय भेगडे, वि.स.स.
१४. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
१५. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
१६. श्री. संजय राठोड, वि.स.स.
१७. श्री.सुर्यकात दळवी, वि.स.स.
१८. ॲड.आशिष जयस्वाल, वि.स.स.
१९. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स
२०. श्री.राजाराम ओझरे, वि.स.स.
२१. श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.
२३. श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२५. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

निमंत्रित

२६. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
२७. श्री.सुरेश हळवणकर, वि.स.स.
२८. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.विलास आठवले, उप सचिव
३) श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
४) श्री.ना.रा. थिटे, अवर सचिव
५) श्री.दिनकर कांबळे,कक्ष अधिकारी

(चार)
पंचायती राज समिती
(सन २०१२-२०१३)

समिती प्रमुख

१. श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स.

सदस्य

२. श्री.काशिराम पावरा, वि.स.स.
३. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.
४. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
५. श्री.विजय खडसे, वि.स.स.
६. श्री.भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
७. श्री.दिलीप माने, वि.स.स.
८. श्री.भारत भालके, वि.स.स.
९. श्री.उदय सामंत, वि.स.स.
१०. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
११. श्री.बापूसाहेब पठारे, वि.स.स.
१२. श्री.आण्णा बनसोडे, वि.स.स.
१३. श्री.दादाराव केचे, वि.स.स.
१४. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
१५. श्री.जयकुमार रावल, वि.स.स.
१६. श्री.विष्णू सावरा, वि.स.स.
१७. श्री.संजय (बंडू) जाधव, वि.स.स.
१८. श्री.संजय राठोड, वि.स.स.
१९. श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
२०. श्री.प्रकाश भोईर, वि.स.स.
२१. श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
२२. डॉ.सुधीर तांबे, वि.प.स.
२३. श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.
२४. श्री.विक्रम काळे, वि.प.स.
२५. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.

निमंत्रीत

२६. श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवायलय अधिकारी</u>

१. डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२. श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
३. श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
४. श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन दहाव्या विधानसभेतील समितीच्या सन १९९६-९७ च्या सातव्या अहवालातील चंद्रपूर व जळगांव जिल्हा परिषदांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालासंबंधीच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईसंबंधी पाचवा अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

समितीचा सातवा अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांना दिनांक २७ जुलै, २००१ रोजी सादर करण्यात आला.

शासनाने समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईच्या संबंधात जारी केलेले आदेश, परिपत्रके इत्यादी परिशिष्ट "अ" मध्ये समाविष्ट केले आहेत. शासनाकडून आलेल्या माहितीच्या संदर्भात समितीने चंद्रपूर जिल्हा परिषदे संदर्भात दिनांक २७ ऑगस्ट, २०१३ रोजी व जळगांव जिल्हा परिषदे संदर्भात दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये दिले आहे.

त्या अहवालातील समितीच्या शिफारशींवर शासनाने केलेली कारवाई विचारात घेतल्यानंतर समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केले आहेत.

श्री.जे.एस. सहारिया, अतिरिक्त मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ.सुधीर गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, कृषि व पणन विभाग, श्री.एस.एस. संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण तथा प्रभारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, रोजगार व जलसंधारण विभाग, श्री.मुकेश खुल्लर, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.श्यामलकुमार मुखर्जी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री.आर.डी.शिंदे, सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, श्री. एकनाथ मोरे, सह सचिव, ग्राम विकास विभाग, श्री.वि.रा. घडेकर, उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. र.प्र. आटे, उप सचिव (समन्वय) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, श्री.सी.एस. डहाळकर, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषद, श्री. सुनील गायकवाड, अति.मु.का.आ. जळगाव, श्री.दा.चि. सूर्यवंशी, मु.अ. तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच श्री.के.एम.विधाते, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी समितीच्या कामकाजात दिलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

सन २००१३-२००१४ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने दिनांक १० जून, २०१४ रोजी अहवाल विचारात घेऊन तो संमत केला.

विधान भवन,
मुंबई
दिनांक :-

जयप्रकाश दांडेगावकर,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

(सहा)

अनुक्रमणिका

अ. क्र.	प्रकरण क्रमांक	विषय	परिच्छेद क्रमांक	पृष्ठ क्रमांक
		जिल्हा परिषद, चंद्रपूर (लेखा)		
(१)	एक	वनसडी-नारडा-अंतरगाव रस्ता डांबरीकरण	**३.८८**	
(२)	दोन	मूल येथील आरोग्य केंद्र सुधार समिती रकमेची संशयित अफरातफर	**३.१६८**	
		जिल्हा परिषद, जळगांव (लेखा)		
(३)	तीन	पंचायत समिती, मुक्ताईनगर ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत शौचालय बांधकामात झालेली अनियमितता	**३.५**	
		परिशिष्ट "अ"		
		शासनाचे आदेश व परिपत्रके		
		परिशिष्ट "ब"		
		समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त		

प्रकरण एक

जिल्हा परिषद चंद्रपूर

एक : वनसडी-नारडा-अंतरगाव रस्ता डांबरीकरण (लेखा परिच्छेद क्र.३.८८)

वनसडी-नारडा अंतरगांव रस्ता कि.मी. २/० ते ३/० चे उष्ण पध्दतीने डांबरीकरण करण्याचे काम लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी राजुरा यांची ५५% जादा दराने लघुत्मक निविदा मंजूर करुन देण्यात आली असून त्यावर रु. ३,९२,५३७/- इतका खर्च केला आहे. याबाबत सन १९९६-९७ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालात स्थानिक निधी लेखा परीक्षकांनी अभिप्राय नोंदविल्यावरुन पंचायती राज समितीने चंद्रपूर जिल्हा परिषदेला भेट देऊन चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व संबंधित अधिकाऱ्यांची दिनांक १४ सप्टेंबर, २००० रोजी साक्ष घेतली होती. उक्त साक्षीत काही मुद्दे उपस्थित झाल्याने त्यावर मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष दिनांक १४ जून २००१ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. उपरोक्त दोन्ही साक्षीमध्ये तसेच विभागीय सचिवांनी केलेल्या खुलाशानुसार समितीने पंचायती राज समितीचा सातवा अहवाल दिनांक २७ जुलै, २००१ रोजी महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाला सादर केला. उक्त अहवालात वनसडी-नारडा-अंतरगांव डांबरीकरणास (परिच्छेद क्र.३.८८) समितीने खालीलप्रमाणे शिफारस केली होती.

"समितीपुढे आलेल्या साक्षीपुराव्यानुसार सन १९९६-९७ या वर्षात चंद्रपूर जिल्हा परिषदेने वनसडी-नारडा- अंतरगांव रस्ता डांबरीकरणाच्या कामाबाबत प्रशासकीय मान्यता न घेता काम सुरु केले असे दिसते. तसेच तांत्रिक मान्यतेशिवाय कामाचे संपूर्ण देयक अदा केले. रस्ता दुरुस्तीच्या कामाबाबत मुख्य अभियंता मान्यता देत असतात. तेव्हा या कामास मुख्य अभियंता यांनी मान्यता दिल्याची जिल्हा परिषदेची धारणा असून कामाचे मूळ, प्राकलन रुपये ४,११,१६०/- रक्कमेचे असून त्यापैकी डांबरीकरणाच्या कामाचे रुपये २,७३,२५५/- ची निविदा मागविण्यात आली होती. सदरहू प्राकलन सन १९९६-९७ च्या दर सूचीनुसार बनविण्यात आले असून प्राकलनाची किंमत रुपये ४,७७,९७५/- होती. त्यापैकी डांबरीकरणाच्या कामाची किंमत रुपये ३,६२,९२५/- इतकी होती. आणि ते ९.८७६ टक्के जास्तीचे मंजूर करण्यात आले. अंदाजपत्रकीय दराच्या जास्तीत जास्त १०% पर्यंत जादा दराची निविदा मंजूर करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या लेखा संहितेमध्ये आहेत व या कामावर एकूण रक्कम रुपये ३,९२,५३७/- इतकी खर्च झाली असून मंजूर किंमतीपेक्षा खर्च झालेली रक्कम कमी आहे असे सांगण्यात आले.

समितीने राज्यातील विविध जिल्हा परिषदांना भेटी देऊन पाहणी केली असता समितीला असे आढळून आले की, जिल्हा परिषदा बहुतेक कामांना प्रशासकीय मान्यता न देता कामे सुरु करतात. तसेच तांत्रिक मान्यता न घेता कामाची देयके संबंधितांना अदा करतात. या बाबीमध्ये अनियमितता होण्याचा संभव नाकारता येत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता सचिव, ग्रामविकास विभाग

यांनी असे प्रतिपादन केले की, प्रशासकीय मान्यतेच्या बाबतीत जिल्हा परिषदेच्या लेखा संहितेमध्ये दुरुस्ती करण्याबाबत विभागाने दुरुस्ती विधेयक वित्त विभागाकडे मान्यतेसाठी पाठविलेले आहे.

याबाबतीत मोजमाप नोंदवहीत सलग तीन दिवस नोंद घेतल्याचे समितीने निदर्शनास आणले. तसेच सुधारित तांत्रिक मान्यता न घेताच कामाचे संपूर्ण देयक अदा केले तसेच **या प्रकरणी मोठ्या प्रमाणावर विसंगती झालेली असून संबंधित अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे दुर्लक्ष करुन काम करणे योग्य नसल्याचे समितीला आढळल्याने समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करते. विभागाने प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता या बाबींचे अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे पालन करण्यासंबंधात एक परिपूर्ण परिपत्रक निर्गमित करावे अशी समितीची आग्रहाची शिफारस असून या संबंधात निर्गमित केलेल्या परिपत्रकाची एक प्रत समितीस पाठविण्यात यावी.**

समितीने केलेल्या शिफारशीनुसार शासनाने काय कारवाई केली याबाबत समितीने अनुपालन अहवालावर चर्चा करण्यासाठी विभागीय सचिवांची साक्ष दिनांक २७ ऑगस्ट, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित केली होती. उक्त साक्षीच्या अनुषंगाने समितीने केलेल्या शिफारशीसंदर्भात शासनाने पाठविलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

"परिपत्रक निर्गमित करण्याबाबतची बाब ही शासन स्तरावरील असल्याने जिल्हा परिषद स्तरावरुन कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही" उक्त माहितीच्या आधारे समितीने दिनांक २७ ऑगस्ट, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता, समितीने या प्रकरणी मोठ्या प्रमाणावर विसंगती झालेली असून संबंधित अधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता या बाबींचे काटेकोरपणे पालन करण्यासंदर्भात एक परिपूर्ण परिपत्रक निर्गमित करण्यात यावे अशी समितीने शिफारस करुनही शासनाने तसे परिपत्रक निर्गमित न करता जिल्हा परिषदेने समितीला कळविले की, परिपत्रक निर्गमित करण्यासंबंधीची बाब ही शासन स्तरावरील असल्याने जिल्हा परिषद स्तरावरुन कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही असे उत्तर दिल्यानंतर यावर विभागाचे काय म्हणणे आहे? अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, समितीने शिफारस केल्याप्रमाणे ग्रामविकास व जलसंधारण विभागाने शासन परिपत्रक निर्गमित केले असून त्याची प्रत समितीला पाठविली आहे. उक्त परिपत्रकाचे अवलोकन केले असता उक्त परिपत्रक क्र.इ ोडपीए-२०१०/प्र.क्र.५३८/वित्त-९, मंत्रालय, मुंबई दिनांक १४ जून, २०१० रोजी परिपत्रक निर्गमित केले असून त्यात जिल्हा परिषद पंचायत समित्या व ग्रामपंचायत स्तरावरील विकास कामे व विकास योजना राबविताना प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेणे बंधनकारक आहे असे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुन्हा सूचित करण्यात येत आहे. यापुढे ज्या जिल्हा परिषांचे मुख्य कार्यकारी अधिकारी/ अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच खाते प्रमुख, गटविकास अधिकारी व अन्य संबंधित प्राधिकारी हे प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता नसताना कामाचे कार्यारंभ

आदेश देतील आणि त्या कामाची देयके जे मुख्य लेखा वित्त अधिकारी/ गटविकास अधिकारी अदा करतील त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात येईल असे या परिपत्रकाद्वारे आदेशित करण्यात येत आहे.

यावर समितीने अशी पृच्छा केली की, समितीने सन २००० मध्ये भेट देऊन सन २००१ मध्ये विभागीय सचिवांची साक्ष घेतली होती आणि उक्त साक्षीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २७ जुलै, २००१ रोजी विधानसभेत अहवाल सादर केला होता. विभागीय सचिवांनी सांगितल्याप्रमाणे उक्त परिपत्रक सुमारे ९ वर्षे विलंबाने निर्गमित केल्यामुळे प्रचंड विलंब झाला आहे असे नमूद केले असता विभागीय सचिवांनी उक्त परिपत्रक विलंबाने काढलेले आहे ही चूक आम्ही मान्य करतो.

<u>अभिप्राय व शिफारशी :</u>

समितीने सन २००१ मध्ये राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाला सातवा अहवाल सादर केला. अहवाल सादर करीत असताना, समितीने सभागृहास अहवाल सादर केल्यानंतर संबंधित विभागाने अहवालातील शिफारशींवर काय कारवाई केली याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यात पाठविणे आवश्यक आहे. तथापि, उक्त माहिती समितीस सन २०१३ मध्ये पाठविण्यात आली यावरुन विभाग समितीने केलेल्या शिफारशींसंदर्भात किती संवेदनशील आहे हे दिसून येते. संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये विधानमंडळाच्या समितीचे एक अनन्यसाधारण महत्व आहे. समित्यांना प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी जागत्या म्हणून जबाबदारी पार पाडावी लागते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या संसदीय समित्या निर्माण करुन त्याद्वारा सातत्याने व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे काम समित्यांद्वारा केले जाते.

उक्त प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता न घेताच कामाची देयके संबंधितांना अदा करण्यात आली व कामे केली. त्यामुळे सदर प्रकरण अत्यंत गंभीर आहे. अशाप्रकारे कामांना मान्यता न घेताच कामे होत असल्यामुळे त्यात आर्थिक अनियमितता व निधीचा गैरव्यवहार अथवा अधिकाऱ्यांकडून मनमानीपणा केला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सन २००० ते २०१० या कालावधीत अशी अनेक प्रकरणे प्रशासकीय व तांत्रिक मान्यता न घेताच मंजूर केल्याची साधार भीती समितीला आहे व म्हणूनच समिती शासनाने परिपत्रक निर्गमित करण्यास दाखविलेल्या दिरंगाईबद्दल अतिव खेद व्यक्त करते व तत्कालीन सर्व संबंधित जबाबदार अधिकारी यांचेविरुध्द (परिपत्रक निर्गमित करण्यास विलंब) निष्काळजीपणा, कर्तव्यात कसूर समितीने केलेल्या

शिफारशींची अवमानना प्रशासकीय जबाबदारीची विश्वासार्हता घालविणे, इत्यादी प्रकरणी चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन कठोर कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे.

प्रशासनातील अधिकारी समितीने केलेल्या शिफारशींकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी त्यांचेविरुध्द कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. एखाद्या प्रकरणी सुमारे ९ वर्षे कार्यवाही न होणे व विभाग प्रमुखांनी केवळ आमच्याकडून चूक झाली एवढेच समितीपुढे नमुद करणे. तथापि, या प्रकरणी समितीने केलेल्या शिफारशींच्या संदर्भात विहित वेळेत कार्यवाही न करणारे जे कोणी जबाबदार आहेत त्यांचेविरुध्द कुठलीही कार्यवाही न करणे याचे समितीला सखेद आश्चर्य वाटते. यापुढे समितीने केलेल्या शिफारशीं संदर्भात शासनाने वेळीच व प्रभावीपणे कारवाई करावी व संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये समितीला असलेले अनन्यसाधारण महत्व विचारात घेता शासन स्तरावरील सर्व संबंधितांना परिपत्रक काढून याबाबतच्या योग्य त्या कडक स्वरुपाच्या सूचना द्याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

दोन : मूल येथील आरोग्य केंद्र सुधार समिती रकमेची संशयित अफरातफर
(लेखा परिच्छेद क्र.३.१६८)

प्राथमिक आरोग्य केंद्र, मूल अंतर्गत परिसर सुधार केंद्राच्या फंडातून वैद्यकीय अधिकारी, डॉ.कु.एस.एस.झुरमुरे आणि रोखपाल, श्री. एस.बी.नक्षिणे यांनी संगनमत करुन रक्कम रुपये ४०,००० औषधी खरेदी करण्यासाठी काढून सदरहू रक्कम स्वत:साठी तब्बल ११ महिने वापरली व त्यानंतर ती बँकेत भरली, दंडात्मक कारवाई म्हणून डॉ.कु.एस.एस.झुरमुरे यांचेकडून १२ टक्के व्याज दर आकारुन व्याजासह रक्कम वसूल केल्याचे समितीस सांगण्यात आले. संबंधित वैद्यकीय अधिकारी व रोखपाल, एस.बी. नक्षिणे यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असून विशेष चौकशी अधिकारी नेमून याबाबत एक वर्षाच्या आत कारवाई करण्यात येईल असे सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस आश्वासित केले. शासकीय रक्कम स्वत:साठी वापरणाऱ्या डॉ.कु.एस.एस.झुरमुरे, वैद्यकीय अधिकारी व श्री.एस.बी.नक्षिणे, रोखपाल यांचेवर विभागीय कारवाई करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

उपरोक्त समितीच्या शिफारशी संदर्भात जिल्हा परिषदेने खालीलप्रमाणे कारवाई केलेली आहे. उपसंचालक, आ.से. नागपूर मंडळ यांनी दिनांक १९.३.२००३ अन्वये आरोप सिध्द झाल्यामुळे डॉ. कु. एस.एस. झुरमुरे, तत्कालीन वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र मूल यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन पत्र क्र. साप्रवि/स्था.२/१८८० दिनांक १८.११.९९ अन्वये प्रस्ताव सादर केला.

विभागीय चौकशीमध्ये आरोप सिध्द झाल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.चंद्रपूर यांनी श्री.एस.बी. नक्षिणे, तत्कालीन रोखपाल तथा कनिष्ठ सहाय्यक यांचेकडून अफरातफरीची रक्कम व्याजासह रुपये २६,८३६/- वसूल करण्यात आली व त्यांना निम्नश्रेणीत आणून त्यांची एक वेतनवाढ चार वर्षाकरीता कायमस्वरुपी रोखण्यात आली आहे.

शासनाने केलेली कार्यवाही पुढीलप्रमाणे आहे, महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शा.नि.क्रमांक विभाचौ-१०-२०००/प्र.क्र.१६०/सेवा-४ दिनांक ५.७.२००८ अन्वये डॉ.कु.एस.एस.झुरमुरे, तत्कालीन वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र मुल यांचेविरुध्द दोषारोप सिध्द होत असल्यामुळे त्यांचे निवृत्ती वेतनातुन दरमहा रुपये २००/-प्रमाणे पाच वर्षाकरीता कपात करण्यात यावे व रुपये ११३९०.३३ त्यांचे सेवानिवृत्ती उपदानातून वसूल करण्यात यावे असा शासन निर्णय आहे.

त्यानुसार महालेखाकार नागपूर-II यांचे प्राधिकार पत्र क्रमांक PR-६/ २१३०८२०८६४/ २/३/११/१०/ ६००५७७६१ अन्वये उपदानातुन रक्कम रुपये ११३९०.३३ वसूल करण्यात आले तसेच

दिनांक ५.७.२००८ ते ४.५.२०१३ पर्यंत निवृत्ती वेतनातून दरमहा रुपये २००/- प्रमाणे कोषागार कार्यालयाकडून वसूल करण्यात आले.

साक्षीचे वेळी प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांनी समितीला अशी माहिती दिली की, यामध्ये डॉ.झुरमुरे, वैद्यकीय अधिकारी आणि श्री.नक्षिणे या दोन्ही अधिकाऱ्यांवर कारवाई झालेली आहे. श्री.नक्षिणे, तत्कालीन रोखपाल यांच्याकडून रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. शिक्षा म्हणून एक वेतनवाढ रोखण्यात आलेली असून त्यांना खालच्या वेतनश्रेणीवर आणण्यात आले आहे.

उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीला अशी माहिती दिली की, हे प्रकरण २००३ च्या पूर्वीचे असून श्री.नक्षिणे यांचेकडून १५७३७/- रुपयांची वसूली केलेली असून वैद्यकीय अधिकारी यांचेकडून ११३९०/- रुपयाची वसूली झालेली आहे.

डॉ.कु.एस.एस. झुरमुरे यांच्या सेवानिवृत्ती उपदानातून दरमहा २००/- रुपये प्रमाणे पाच वर्षापर्यंत ११३९०/- रुपयांची वसुली करण्यात आली. श्री.नक्षिणे यांना निलंबित करण्यात आले असून त्यांना कनिष्ठ सहायक या पदाच्या खालच्या पदावर आणण्यात आलेले आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

समितीने केलेल्या शिफारशी नुसार श्री.नक्षिणे व डॉ.कु. एस.एस. झुरमुरे यांचेकडून वसुल पात्र रक्कमेची वसुली करण्यात आली असुन त्यांचेवर प्रशासकीय कारवाई देखील करण्यात आली आहे. असे समितीला निदर्शनास आणुन देण्यात आले आहे. तथापि, सदरची कार्यवाही खूपच विलंबाने केली असल्यामुळे समिती याबाबत खेद व्यक्त करते. समितीने गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द त्वरेने कार्यवाही केल्यास त्याचा धाक इतर अधिकारी/कर्मचाऱ्यांवर देखील राहते असे समितीला प्रकर्षाने वाटते. सबब, **यापुढे लेखा आक्षेपात नमुद वसुल पात्र रकमेची वसुलीची कारवाई तत्परतेने करुन कोणत्याही स्थितीत कर्मचारी सेवानिवृत्त होणे पुर्वीच त्यांचेकडून सेवा कालावधीतील अनियमिततेबाबत वसुल करावयाची रक्कम वसुल करणेची कारवाई करणेबाबत शासनाने सर्व विभागांना परिपुर्ण परिपत्रक काढून कडक स्वरुपाच्या सुचना द्याव्यात अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावी.**

जिल्हा परिषद जळगांव (लेखा)

तीन : पंचायत समिती, मुक्ताईनगर ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत शौचालये बांधकामात झालेली अनियमितता (परिच्छेद क्र.३.५)

समितीने दिनांक २५ सप्टेंबर, २००० रोजी जळगांव जिल्हा परिषदेला भेट देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व संबंधीत विभागीय अधिकारी यांची साक्ष घेतली होती. उक्त साक्षीत उपस्थित झालेल्या मुद्यांसंदर्भात समितीने दिनांक २७ जून, २००१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त दोन्ही साक्षीत उपस्थित झालेल्या बाबी व विभागाने पाठविलेल्या माहितीच्या आधारे समितीने तीचा सातवा अहवाल राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहास दिनांक २७ जुलै, २००१ रोजी सादर केला.

जळगांव जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती, मुक्ताईनगर ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत शौचालये बांधकामात झालेली अनियमितता (परिच्छेद क्र.३.५) यासंदर्भात समितीने खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

समितीपुढे आलेली माहिती व विभागीय प्रतिनिधींच्या साक्षीवरुन असे दिसते की, जळगांव जिल्ह्यात ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत २३,८९५ शौचालयाचे उद्दिष्ट ठरवून दिले होते. त्यानुसार केंद्र शासनाने प्रती शौचालय १००० रुपये तर प्रती शौचालय १५०० रुपये राज्य शासनाने आपला हिस्सा दिला. मात्र जिल्हा परिषद आपला हिस्सा देऊ शकली नाही. परिणामी अनेक लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले.

समितीला असे दिसून आले की, शौचालयाचे बांधकाम न करता संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रकमेची उचल केली. समितीच्या जिल्हा परिषदेच्या भेटीच्या व सचिवांच्या साक्षीच्या वेळी मुक्ताईनगर तालुक्यात शौचालयाच्या बांधकामात रु. १६,९५,००० एवढ्या रकमेचा अपहार झाल्याचे समितीला सांगण्यात आले. अपहार केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना निलंबित केले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु असल्याचे समितीला सांगण्यात आले. या प्रकरणी गुंतलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांची संपूर्ण यादी व अपहारातील रक्कम याबाबतची सविस्तर माहिती समितीला अधिक माहितीद्वारे कळविण्यात आली. या सर्व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी लवकरात लवकर पूर्ण करुन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत जळगाव जिल्ह्यामधील काही तालुक्यांच्या आम सभेमध्ये शौचालयाच्या बांधकामासंदर्भात चौकशी करण्यात यावी असे ठराव झाले असल्यामुळे, सचिवांनी मान्य केल्याप्रमाणे संपूर्ण जळगाव जिल्ह्यातील शौचालय बांधकामाची विभागीय आयुक्त यांचेकडून चौकशी करण्यात येऊन चौकशीचा अहवाल दोन महिन्यात समितीला सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

उक्त अहवालात केलेल्या शिफारशीं संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली हे जाणुन घेण्यासाठी समितीने दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ रोजी विभागीय सचिव व जिल्हा परिषदेचे सर्व संबंधीत अधिकारी यांची साक्ष घेतली.

उक्त साक्षीच्या अनुषंगाने शासनाने समितीने केलेल्या शिफारशी संदर्भात समितीला खालीलप्रमाणे माहिती पाठविली.

उपरोक्त शिफारशीच्या संदर्भात कार्यवाही अहवालाविषयी साक्षीच्या वेळी शासनाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती सादर करण्यात आली.

प्रस्तुत प्रकरणी विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांच्या कडुन प्राप्त चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधीत जबाबदार कर्मचाऱ्यांविरुध्द खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. सोबत सर्व आदेश जोडण्यात आलेले आहे.

१. श्री.आर.एल. जैन (ग्रा.वि.अ.) यांच्या वरील आरोपांच्या अनुषंगाने केलेल्या विभागीय चौकशीच्या अंती श्री.जैन यांच्या वरील आरोप सिध्द झालेले नसल्याने त्यांना सेवेत पुन:स्थापित करण्यात आलेले आहे.

२. श्री.डी.डी. निकम, ग्रा.से. यांना इकडील जा.क्र. ग्रापं/ आस्था ३ / आरआर/ ८८३ /२००८ दिनांक :- २४/१०/२००८ च्या आदेशान्वये सक्तीने सेवा निवृत्त करण्यात आले आहे.

३. श्री.एस.टी.कुवंर, ग्रा.से.यांना इकडील जा.क्र.ग्रापं/ आस्था १/ आरआर/४७४/ २००२ दिनांक :- ३०/०३/२००२ च्या आदेशान्वये मूळ वेतनावर आणण्यात आलेले आहे.

४. श्री.डी.आर.शिरतुरे, ग्रा.से.यांना इकडील आदेश जा.क्र.ग्रापं./ आस्था१/ आरआर/ ११६९/०२ दिनांक :- २८/०२/२००४ अन्वये पाच वर्षाकरीता मूळ वेतनावर आणण्यात आलेले आहे.

५. श्री.बी.एस.पाटील, ग्रा.से.यांना इकडील जा.क्र. ग्रापं/ आस्था२/ आरआर/११२२/२००४ दिनांक :- ३०/०९/२००४ च्या आदेशान्वये पाच वर्षासाठी मूळ वेतनावर आणण्यात आलेले आहे.

६. श्री. आर.एन.सोनवणे, ग्रा.से. यांना इकडील जा.क्र.ग्रापं/ आस्था १ /आरआर/ ९९९/ २००२ दिनांक :- १५/०६/२००२ अन्वये बडतर्फ करण्यात आले.

७. श्री.इ.के.सोनवणे, ग्रा.से. यांना इकडील जा.क्र. ग्रापं/ आस्था/ आरआर/११०१/ २००२ दिनांक :- २९/०६/२००२ अन्वये बडतर्फ करण्यात आलेले आहे.

८. श्री.भिष्मा धर्मा तायडे, ग्रा.से. यांना इकडील जा.क्र.ग्राप/ आस्था २ /आरआर/ ६३/२००५ दिनांक :- १९/०१/२००५ च्या आदेशान्वये बडतर्फ करण्यात आलेले आहे.

९. श्री.व्ही.एच.चिनावले, ग्रा.वि.अ. हे दिनांक :- ३१/०५/२००० रोजी नियत सेवा निवृत्त झाले आहेत तथापि त्यांनी केलेल्या अपहाराबाबत त्यांच्यावर फौजदारी कार्यवाही केलेली

असुन सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. त्यामुळे सदर कार्यवाही अंतिम झालेली नाही.

१०. श्री. एस.बी.देवराज, ग्रा.से.यांना इकडील जा.क्र.ग्रापं/ आस्था२/ आरआर/ ६७८/२००५ च्या आदेशान्वये १ वेतन वाढ कायमस्वरुपी बंद करणेबाबत शिक्षा करण्यात आलेली आहे.

११. श्री. डी.यु.ठाकरे, ग्रा.से.यांना इकडील आदेश जा.क्र. ग्रापं/ आस्था२/ आरआर/ १३५/ २००७ दिनांक :- २३/०३/२००७ च्या आदेशान्वये संबंधीतास निम्न वेतन श्रेणीवर आनण्यात आलेले आहे व अपहारीत रक्कम वसुली बाबत आदेश दिलेले आहे.

१२. श्री.आर.एस.पाटील, ग्रा.से. यांना इकडील जा.क्र.ग्रापं/ आस्था१/ आरआर/१०५१/२००२ दिनांक २०/०६/२००२ च्या आदेशान्वये मूळ वेतनावर आणण्यात आले आहे व पुढील वर्षापासून वार्षिक वेतन वाढ त्यांना देय राहील.

१३. व १४. श्री.डी.बी. शिंदे, ग्रा.से. यांना इकडील आदेश जा.क्र. ग्रापं/ आस्था २ / आरआर/ ३६८/२००५ दिनांक :- २१/०३/२००५ च्या अन्वये समय वेतन श्रेणीतील १ वेतन वाढ २ वर्षाकरीता बंद करणेबाबत आदेशित केले आहे.

१५.श्री.व्ही.पी. तायडे, ग्रा.से. यांना इकडील जा.क्र. ग्रापं/ आस्था/ आरआर/ १११७/ २००४ दिनांक :- २९/०९/२००४ च्या आदेशान्वये मुळ वेतनावर आणण्यात आलेले आहे.

उक्त माहितीच्या अनुषंगाने दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ रोजी घेण्यात आलेल्या मंत्रालयीन विभागीय साक्षीच्या वेळी समितीने विभागीय सचिवांना अशी विचारणा केली की, जिल्हा परिषद जळगाव संबंधात पंचायती राज समितीने सादर केलेल्या सातव्या अहवालावरील केलेल्या कार्यवाहीबाबतच्या अनुपालन अहवालाबाबतची पंचायत समिती मुक्ताईनगर, ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम अंतर्गत शौचालय बांधकामात अनियमितता झाल्याबाबत. या बाबतची अपहारातील १६ लक्ष ९५ हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे काय ? त्यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी एकूण वसूल पात्र रक्कमेपैकी रु.१४, ००,०००/- (चौदा लाख) अद्यापही वसुल होणे बाकी असल्याचे सांगितले. या प्रकरणांमध्ये जबाबदार असणाऱ्यांवर केलेल्या कारवाईच्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, श्री. जैन, ग्रा.वि.अ. यांच्यावरील विभागीय चौकशीच्या अंती त्यांच्यावरील आरोप सिध्द झालेले नसल्याने त्यांना सेवेत पुन:स्थापित केले आहे. श्री. निकम, ग्रा.से. यांना दि. २४.१०.२००८ च्या आदेशान्वये सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले आहे. श्री. कुवंर, ग्रा.से. यांना दि. ३०.३.२००२ च्या आदेशान्वये मूळ वेतनावर आणण्यात आले आहे. श्री. शिरतुरे, ग्रा.से. यांना दि. २८.२.२००४ अन्वये पाच वर्षे मूळ वेतनावर आणण्यात आले आहे. श्री. पाटील, ग्रा.से. यांना दि. ३०.९.२००४ च्या आदेशान्वये पाच वर्षे मूळ वेतनावर आणण्यात आले आहे. श्री. आर.एन. सोनवणे, ग्रा.से. यांना दि. १५.६.२००२ अन्वये बडतर्फ करण्यात आले आहे. श्री.इ.के.सोनवणे,

ग्रा.से.यांना दि. २९.६.२००२ अन्वये बडतर्फ करण्यात आले आहे. श्री. तायडे, ग्रा.से.यांना दि. १९.१.२००५ अन्वये बडतर्फ करण्यात आले आहे. श्री. चिनावले, ग्रा.वि.अ. दि. ३१.५.२००० रोजी सेवानिवृत्त झाले असून त्यांनी केलेल्या अपहाराबाबत त्यांच्यावर फौजदारी कार्यवाही केलेली आहे. सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. श्री. देवराज, ग्रा.से. यांना सन २००५ च्या आदेशान्वये १ वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करण्याबाबत शिक्षा केलेली आहे. श्री. ठाकरे, ग्रा.से. यांना दि. २३.३.२००७ च्या आदेशान्वये निम्न वेतनश्रेणीवर आणण्यात आलेले आहे. अपहारीत रकमेच्या वसुलीचे आदेश दिलेले आहेत. श्री. पाटील, ग्रा.से. यांना दि. २०.६.२००२ अन्वये मूळ वेतनावर आणले आहे. श्री. शिंदे, ग्रा.से. दि. २१.३.२००५ अन्वये १ वेतनवाढ २ वर्षांकरिता बंद करण्याबाबत आदेशित केले आहे. श्री. तायडे, ग्रा.से. यांना दिनांक २९.९.२००४ च्या आदेशान्वये मूळ वेतनावर आणण्यात आले आहे. परंतु उपरोक्त कारवाईमध्ये अपहारित रक्कमेची वसुली करण्याची कारवाई केलेली नाही. समितीने अपहारीत रक्कमेच्या वसुलीबाबत व अपहारास जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांचेवर करण्यात आलेल्या कारवाईबाबत समितीने विचारलेल्या प्रश्नांना योग्य उत्तरे देण्यात न येणे तसेच श्री.निकम यांना पेन्शन लागू केलेली नाही. अशी समितीने पृच्छा केली असता, श्री.निकम यांची सेवा बाकी असेल तर, त्यांच्याकडून येणे असलेल्या रक्कमेची वसुली केल्याशिवाय त्यांना सक्तीने सेवानिवृत्त करता कामा नये होते.

त्यावर समितीने असा मुद्दा उपस्थित केला की, जेव्हा समितीच्या बैठकीमध्ये सन्माननीय सदस्य, अधिकाऱ्यांना प्रश्न विचारतात तेव्हा त्यांची काहीच तयारी नसते. खरे तर समिती समोर साक्षी करिता येताना अधिकाऱ्यांनी आपल्या सोबत संबंधित प्रकरणांच्या नस्ती आणल्या पाहिजेत व त्यातील माहिती समितीला दिली पाहिजे. समितीच्या बैठकीत अधिकारी जर अशा प्रकारे माहिती देत नसतील तर आपण काय करायचे ?

प्रधान सचिव ग्रामविकास यांनी अशी माहिती दिली की, समितीच्या साक्षीमध्ये सन्माननीय सदस्य उप प्रश्न विचारतात. परंतु, त्यातील सर्वच प्रश्नांना अधिकाऱ्यांकडून उत्तर मिळतेच असे नाही. ही बाब मी मान्य करतो. या संदर्भात असे नमूद करु इच्छितो की, साक्षीमध्ये एखाद्या प्रकरणाच्या अनुषंगाने कशा प्रकारचे प्रश्न विचारले जातील या दृष्टीने अधिकारी तयारी करुन येतात. परंतु, कल्पनाशक्तीलाही मर्यादा असते. मी नम्रपणे एवढेच सांगू इच्छितो की, आम्ही असत्य उत्तरे देत नाही. आम्ही केवळ वस्तुस्थितीचे समर्थन करतो.

त्यावर समितीने असे नमुद केले की, विधानसभेत आम्ही जे उप प्रश्न विचारतो त्यांची माहिती अगोदर आम्ही देत नाही. त्या प्रमाणेच आपणही साक्षीकरिता येताना संबंधित प्रकरणांच्या नस्ती आणल्यास आपणांस त्यामध्ये पाहून त्यांची माहिती देता आली पाहिजे. व हे त्या विभाग प्रमुखाचे कर्तव्य आहे. या प्रकरणामध्ये किती रकमेची वसुली झाली, किती रकमेची वसुली होणे बाकी आहे, सक्तीने सेवानिवृत्त केल्यानंतर किती वर्षे सेवा बाकी होती, दोषींवर कोणती कारवाई केली या सर्व बाबींची माहिती समितीला देणे आवश्यक आहे. तथापी अशी माहिती संबंधीत अधिकाऱ्यांकडून

समितीला देण्यात आलेली नाही. समिती केवळ प्रकरणाधीन बाबीचीच अधिकाऱ्यांकडून माहिती घेत असते.

अभिप्राय व शिफारशी :-

पंचायत समिती मुक्ताईनगर ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम अंतर्गत शौचालय बांधकामाबाबत व अपहारातील १६ लाख ९५ हजार रुपयाची वसूली करण्यात यावी असे निदेश दिले होते. त्यावर यासंदर्भात चौकशी करुन चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषींपैकी काहिवर एक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करण्याची कारवाई केली आहे. या प्रकरणामध्ये रु.२,८७,९२२ तसेच १,३२,४००/- रुपयाची वसूली झालेली आहे. यापैकी दोन प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. न्यायप्रविष्ठ प्रकरणामध्ये ८ लाख ७३ हजार रुपयाच्या वसूलीच्या प्रकरणाचा समावेश आहे. याचा अर्थ १७ लाख रुपयांपैकी ३ लाख रुपयाची वसूली झालेली असून १४ लाख रुपये वसूली अद्यापही बाकी असल्याचे दिसून आलेले आहे. उपरोक्त कारवाईमध्ये अपहारित रक्कमेची वसूली करण्याची कारवाई केलेली नाही. सचिवांनी दिलेल्या माहितीवरुन लक्षात आले की, अद्याप १४ लाख रुपयांची वसूली होणेबाकी आहे.

मुक्ताईनगर तालुक्यात शौचालयाच्या बांधकामात १६,९५,०००/- एवढ्या रक्कमेचा अपहार झाल्याचे समितीला सांगण्यात आले असून ८ लाख ७३ हजार रुपये इतक्या वसुलीची प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. तर काही दोषींवर सेवानिवृत्त झाल्यावर पोलीस कारवाई करण्यात आली आहे. श्री.निकम यांना सक्तीने सेवानिवृत्त केले असून त्यांच्याकडे दोन प्रकरणामध्ये २,८७,९२२/- रुपयाची तसेच १,३२,०००/- रुपयाची वसूली झालेली आहे. तर दोन प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. तसेच श्री.निकम यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात आला असून त्यांना सक्तीने सेवानिवृत्त केले आहे.

शासनाने अनेक अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुध्द कार्यवाही केली असून काही जणांवर फौजदारी कारवाई देखील केली असल्याने याबाबत समिती समाधान व्यक्त करते. तथापी अजूनही १४ लाख रक्कम वसूल होणे बाकी आहे. याबाबत सखेद आश्चर्य व्यक्त करते. या प्रकरणी कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करत असताना शासनाची या गैरव्यवहार प्रकरणी हडप केलेली रक्कम त्वरेने वसूल होणे आवश्यक आहे. सदर अपहारित रक्कम प्राधान्य क्रमाने व्याजासह वसूल करावी अशी समितीची शिफारस आहे.

तसेच बरेच वेळा समितीसमोर साक्षीला येताना अधिकारी संबंधीत नस्तीचा व्यवस्थित अभ्यास करुन येत नाहीत व समितीला उत्तरे देताना परिपुर्ण व अभ्यास पुर्ण उत्तरे देत नाहीत. त्यामुळे समितीने विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे अनुत्तरीत राहतात. माहिती पाहून सांगतो, नंतर पाठवितो इत्यादी सबबी सांगितल्या जातात. समिती केवळ प्रकरणाधीन बाबी संदर्भात संबंधीत अधिकाऱ्यांना विचारणा करीत असते, अशा वेळी त्या अधिकाऱ्यांने उक्त प्रकरणातील संभाव्य माहिती अवगत करुन हजरजबाबीपणे समितीला देणे आवश्यक आहे. परंतु बरेच अधिकारी वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न

करतात विभागीय सचिवांनी तर कल्पना शक्तीलाही मर्यादा असते, असे म्हणून एक प्रकारे प्रशासनातील अधिकाऱ्यांची पाठराखन केली असून समितीचा अनादरच केल्याचे दिसून येते. **सबब, समिती समोर उत्तरे देताना किंवा एखादी बाब मांडताना अधिकाऱ्यांनी संसदीय प्रथेपरंपरेचे भान राखून त्यांच्यावर असलेली जबाबदारी पाळणे देखिल महत्वाचे आहे. विधानमंडळाच्या समितीसमोर साक्ष देताना सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी प्रकरणाधिन बाबींचा सखोल, सर्वंकष अभ्यास करुन व संबंधीत नस्ती बैठकीत सोबत ठेवून समितीने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे वस्तुनिष्ठ, अभ्यासपूर्ण व परिपूर्ण माहिती समितीला द्यावी व तशा प्रकाराच्या कडक स्वरुपाच्या सूचनांचे परिपत्रक काढून सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना निर्गमित करावे अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात पाठविण्यात यावी.**

परिशिष्ट "अ"
शासनाचे आदेश व परिपत्रके

परिशिष्ट "ब"
समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

मंगळवार, दिनांक २७ ऑगस्ट, २०१३
स्थळ : विधान भवन, मुंबई.

उ प स्थि ती

१) श्री.चंद्रकांत दानवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.काशिराम पावरा, वि.स.स.
३) श्री.विजय खडसे, वि.स.स.
४) श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
५) श्री.बापुसाहेब पठारे, वि.स.स.
६) श्री.दादाराव केचे, वि.स.स.,
७) श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
८) श्री.विष्णु सावरा, वि.स.स.
९) श्री.संजय (बंडु) जाधव, वि.स.स.
१०) श्री.संजय राठोड, वि.स.स.
११) श्री.सूर्यकांत दळवी, वि.स.स.
१२) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
१३) श्री.दिपक साळुंखे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१. श्री.विलास आठवले, उप सचिव
२. श्री.गं.दु.कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी (लेखा)
३. श्री.ना.रा थिटे, अवर सचिव

विभागीय प्रतिनिधी

१. श्री.जे.एस. सहारिया, अतिरिक्त मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग
२. डॉ.सुधीर गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, कृषि व पणन विभाग
३. श्री.एस.एस. संधू, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण तथा प्रभारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
४. श्री.व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, रोजगार व जलसंधारण विभाग
५. श्री.मुकेश खुल्लर, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,
६. श्री.श्यामलकुमार मुखर्जी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,
७. श्री.आर.डी.शिंदे, सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग
८. श्री.वि.रा. घडेकर, उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
९. श्री.सी.एस. डहाळकर, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने सातव्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात अतिरिक्त मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, अतिरिक्त मुख्य सचिव, कृषि व पणन विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण तथा प्रभारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, रोजगार व जलसंधारण विभाग, आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४
स्थळ : विधान भवन, मुंबई.

उ प स्थि ती

(१) श्री. जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स., तथा समिती प्रमुख
(२) श्री. वैजनाथ शिंदे, वि.स.स.,
(३) श्री. विजयराव खडसे, वि.स.स.,
(४) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.,
(५) श्री. संजय भेगडे, वि.स.स.,
(६) श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स.,
(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.,
(८) श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.,

निमंत्रित

(१) श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स.,
(२) श्री. दादराव केचे, वि.स.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. गंगाधर कोहळे, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी (लेखा)
(२) श्री. ना.रा. थिटे, अवर सचिव

स्थानिक निधी, लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य

(१) श्री. के. एम. विधाते, संचालक

विभागीय प्रतिनिधी

(१) श्री. एस.एस. संधू, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग
(२) श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग
(३) श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(४) श्री. सुनील गायकवाड, अति.मु.का.आ. जळगाव
(५) श्री. एकनाथ मोरे, सह सचिव, ग्राम विकास विभाग
(६) श्री. र.प्र. आटे, उप सचिव (समन्वय) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
(७) श्री. दा.चि. सूर्यवंशी, मु.अ. तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने सातव्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच अति.मु.का.आ. जिल्हा परिषद जळगाव यांची साक्ष घेतली.

स्थळ : विधान भवन, मुंबई.

<u>उ प स्थि ती</u>

समिती प्रमुख

१. श्री.जयप्रकाश दांडेगावकर, वि.स.स.

सदस्य

२. श्री.वैजनाथ शिंदे, वि.स.स.
३. श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.
४. श्री.विजयराव खडसे, वि.स.स.
५. श्री.भारत भालके, वि.स.स.
६. श्री.राजकुमार बडोले, वि.स.स.
७. श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

निमंत्रित

८. श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
९. श्री.दादाराव केचे, वि.स.स.

<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.विलास आठवले, उप सचिव
३) श्री.गंगाधर कोहळे, उप सचिव
४) श्री.ना.रा. थिटे, अवर सचिव

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने पाचव्या अनुपालन अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन काही सुधारणांसह संमत केला.